**बीज भांडवल योजनेत धोरणात्मक बदल करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्र.इपीपी २००१/५८६५८/(७४६३)/उ.१८

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक :- १५ सप्टेंबर, २००३

**पहा -** १) शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, क्र. इपीपी १०९२/(६३६४)/उद्योग-१८, दिनांक १९ ऑगस्ट, १९९२

२) शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्र. इपीपी - १०९२/१३१९१/(६३५६)/ उद्योग-१८ दिनांक ३० सप्टेंबर, १९९३

**प्रस्तावना -**

सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता या सुशिक्षित बेरोजगारांना उपलब्ध साधन संपत्तीवर आधारित अशी स्वयंरोजगार योजना सुरु केल्यास त्यांना रोजगार उपलब्ध होईल या उद्देशाने सन १९७२ साली केंद्र शासनाने सुशिक्षित बेरोजगारांना बीज भांडवल योजना सुरु केली. ही योजना १९७६-७७ पासून उद्योग संचालनालय व शासनाची प्रादेशिक विकास महामंडळे यांचेमार्फत राबविण्यात येत होती. त्यावेळी अर्जदारास मंजूर केलेल्या बीज भांडवलावर द.सा.द.शे. ४ टक्के व्याजदर आकारण्यात येत होता. त्यानंतर १९९३ मध्ये अंमलात आलेल्या महाराष्ट्राच्या नवीन औद्योगिक धोरणानुसार या योजनेमध्ये सुधारणा करण्यात आली. त्याप्रमाणे बीज भांडवल सहाय्य योजनांची केंद्र शासनाच्या राष्ट्रीय समभाग निधी योजनेशी सांगड घालून आणि पुनर्रचना करुन सदरहू योजनेच्या अंमलबजावणीचे/ वाटपाचे काम दिनांक १ ऑक्टोबर १९९३ पासून जिल्हा उद्योग केंद्राकडे सोपविण्यात आले. या सुधारित योजनेनुसार अर्जदारास जास्तीत जास्त रु. १.५ लाखापर्यंत अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत तसेच त्यावर १० टक्के व्याज आकारण्याची तरतूद करण्यात आली व अद्यापही हीच प्रणाली सुरु आहे. या योजनेंतर्गत प्रदान वितरित करण्यात आलेल्या वित्तीय सहाय्यावर आकारण्यात येणारे रु. १४ टक्के दंडव्याज कमी करणे, दंडव्याज माफ करणे, कर्जाच्या हप्त्यांची पुनर्बांधणी करणे आणि या योजनेखाली जे लाभार्थी बीज भांडवल कर्जाचा भरणा नियमितपणे करतील त्यांना बीज भांडवल कर्जावर आकारण्यात येणाऱ्या व्याजाच्या दरामध्ये काही प्रमाणात सूट देणे, इत्यादी बाबी लक्षात घेऊन या बीज भांडवल योजनेत धोरणात्मक बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

शासन आता या आदेशान्वये बीज भांडवल योजनेंतर्गत वितरीत करण्यात आलेल्या वित्तीय सहाय्याची वसुली परिणामकारकरित्या होण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देत आहे.

१) कर्जदाराने बीज भांडवल कर्जाच्या रकमेची विहित कालमर्यादेत परतफेड केली नाही तर थकलेल्या रकमेवर सध्या आकारण्यात येणारे द.सा.द.शे.१४% दंडनीय व्याज कमी करुन ते द.सा.द.शे. ३% आकारण्यात यावे. कमी करण्यात येणारा दंडनिय व्याजाचा दर पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात यावा. मात्र ज्या कर्जदाराने हे आदेश काढण्यापूर्वी दंडव्याजासह रक्कम भरली आहे त्याचे बाबतीत द.सा.द.शे. ३% दंडव्याज आकारणीमुळे रक्कम देय होत असेल तर ही परत करण्यात येणार नाही. आकारणी संदर्भासाठी उदाहरण म्हणून विवरणपत्रातील क्रमांक १ पहावा.

२) कर्जदार थकीत व्याज व मुद्दल एकरकमी भरण्यास तयार असेल तर दंडनीय व्याज माफ करण्यात यावे हे दंडनीय व्याज माफ करण्याचे अधिकार मुंबई व उपनगर जिल्ह्यांसाठी उद्योग सहसंचालक,

जिल्हयासाठी संबंधित जिल्हा उद्योग केंद्रांचे
मुंबई प्राधिकरण विभाग चुनाभट्टी, मुंबई व राज्यातील इतर महाव्यवस्थापक, यांना देण्यात येत आहेत. आकारणी संदर्भासाठी उदाहरण म्हणून विवरणपत्रातील क्रमांक २ पहावा.

३) जे कर्जदार थकित मुद्दल व व्याज रकमेच्या ५०% रक्कम एकरकमी भरण्यास तयार असतील तर ५०% दंडनीय व्याज माफ करण्यात यावे. हे दंडनीय व्याज माफ करण्याचे अधिकार मुंबई व उपनगर जिल्हयासाठी उद्योग सहसंचालक, मुंबई प्राधिकरण विभाग चुनाभट्टी, मुंबई तसेच राज्यातील इतर जिल्हयासाठी संबंधित जिल्हा उद्योग केंद्रांचे महाव्यवस्थापक, यांना देण्यात येत आहेत. आकारणी संदर्भासाठी उदाहरण म्हणून विवरणपत्रातील क्रमांक ३ पहावा.

४) या योजनेअंतर्गत बँकेने लाभार्थ्यास कर्जाच्या हप्त्यांची पुनर्बांधणी सरळव्याज आकारुन करुन दिल्यास शासनाकडूनही बँकेच्या कालावधीपेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीकरीता बीज भांडवल कर्जाच्या हप्त्यांची पुनर्बांधणी सरळ व्याज आकारुन करुन देण्यात यावी.

५) सध्या बीज भांडवल कर्जावर आकारण्यात येणारा व्याजाचा दर द.सा.द.शे. १० टक्के आहे जे लाभार्थी बीज भांडवल कर्जाचा भरणा नियमितपणे विहित कालावधीत करतील त्या लाभार्थींना ३ टक्के रिबेट देण्यात यावे म्हणजेच अशा कर्जदाराकडून देय तारखेस रक्कम जमा होत असेल त्यावेळी त्याचेकडून केवळ ७% द.सा.द.शे. व्याजाने आकारणी करुन रक्कम भरुन घ्यावी. आकारणी संदर्भासाठी उदाहरण म्हणून विवरणपत्रातील क्रमांक ४ पहावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स.प्र.ठाकरे)
शासनाचे अवर सचिव

## शासन निर्णय क्रमांकःइपीपी-१००१/१४८५८/(७४९१)/उद्योग-१८,
## दि. १५ सप्टेंबर २००३ चे विवरणपत्र

१) कर्जदारास बीज भांडवल योजनेअंतर्गत देण्यात असलेले कर्ज रु.१,००,०००/-

कर्ज वितरणाचा दिनांक ०१.१०.१९९५

विलंबावधी :- अ) उद्योग, सेवा उद्योग, व्यवसाय- ३ वर्ष-०१.१०.१९९५ ते ०३०.९.१९९८.

ब) वाहन व्यवसाय - ६ महिने-०१.१०.१९९५ ते ०३१.०३.१९९६.

**जर लाभार्थ्याने कर्जाची परतफेड खालीलप्रमाणे केली नसेल तर**

**अ) दंडव्याज १४ टक्के आकारणी करुन खालीलप्रमाणे देय राहील.**

| अ. क्र. | देय दिनांक | देय रक्कम | | | परतफेड | | | शिल्लक रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुद्दल | व्याज | दंडव्याज | मुद्दल | व्याज | दंडव्याज | मुद्दल | व्याज | दंडव्याज |
| १ | १.१०.१९९६ | - | १०,००० | - | - | - | - | - | १०,००० | - |
| २ | १.१०.१९९७ | - | १०,००० | - | - | - | - | - | २०,००० | - |
| ३ | १.१०.१९९८ | - | १०,००० | - | - | - | - | - | ३०,००० | - |
| ४ | १.१०.१९९९ | २५,००० | १०,००० | ४,२०० | - | - | - | २५,००० | ४०,००० | ४,२०० |
| ५ | १.१०.२००० | २५,००० | १०,००० | ९,१०० | - | - | - | ५०,००० | ५०,००० | १३,३०० |
| ६ | १.१०.२००१ | २५,००० | १०,००० | १४,००० | - | - | - | ७५,००० | ६०,००० | २७,३०० |
| ७ | १.१०.२००२ | २५,००० | १०,००० | १८,९०० | - | - | - | १००,००० | ७०,००० | ४६,२०० |

**ब) द.सा.द.से. १४ टक्के दंडनीय कमी करुन त्याऐवजी ३ टक्के आकारणी करुन खालीलप्रमाणे देय राहील.**

| अ. क्र. | देय दिनांक | देय रक्कम | | | परतफेड | | | शिल्लक रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुद्दल | व्याज | दंडव्याज | मुद्दल | व्याज | दंडव्याज | मुद्दल | व्याज | दंडव्याज |
| १ | १.१०.१९९६ | - | १०,००० | - | - | - | - | - | १०,००० | - |
| २ | १.१०.१९९७ | - | १०,००० | - | - | - | - | - | २०,००० | - |
| ३ | १.१०.१९९८ | - | १०,००० | - | - | - | - | - | ३०,००० | - |
| ४ | १.१०.१९९९ | २५,००० | १०,००० | ९०० | - | - | - | २५,००० | ४०,००० | ९०० |
| ५ | १.१०.२००० | २५,००० | १०,००० | १,९५० | - | - | - | ५०,००० | ५०,००० | २,८५० |
| ६ | १.१०.२००१ | २५,००० | १०,००० | ३,००० | - | - | - | ७५,००० | ६०,००० | ५,८५० |
| ७ | १.१०.२००२ | २५,००० | १०,००० | ४,०५० | - | - | - | १००,००० | ७०,००० | ९,९०० |

**वरील (अ) आणि (ब) चे परिक्षण केल्यास दंडव्याज ३ टक्के आकारणीमुळे रु.३६,३००/- ची सवलत देय होईल.**

२) कर्जदाराने वरील उदाहरणामधील परतफेड कालावधीत केली नाही व मुद्दल व व्याज रक्कम अनुक्रमे रु.१,००,०००/- व रु.७०,०००/- अशी एकूण रु.१,७०,०००/- एकरकमी भरण्यास कर्जदार तयार असेल **तर दंडव्याज रु.९,९००/- माफ करण्यात येईल.**

३) कर्जधाराने परतफेड काहीच केली नसेल व त्याचे मुद्दल रु.१,००,०००/- व व्याज रु.७०,०००/- असेल त्यापैकी ५० % रक्कम म्हणजेच रु.८५,०००/- एक रकमी भरण्यास कर्जदार तयार असेल **तर ५०% दंडनीय व्याज रु.४,९५०/- माफ करण्यात येईल.**

४) कर्जदाराने मुद्दल व व्याज विहित कालावधीमध्ये पूर्ण भरले असल्यामुळे कर्जदारांना व्याजामध्ये ३% सवलत म्हणजे ७% द.सा.द.शे.प्रमाणे वसुली होईल.

**अ लाभार्थीने वेळेत कर्जाची परतफेड केली तर ( द.सा.द.शे.१० टक्के प्रमाणे )**

| अ. क्र. | देय दिनांक | देय रक्कम | | | परतफेड | | | शिल्लक रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुद्दल | व्याज | दंडव्याज | मुद्दल | व्याज | दंडव्याज | मुद्दल | व्याज | दंडव्याज |
| १ | १.१०.१९९६ | - | १०,००० | - | - | १०,००० | - | - | - | - |
| २ | १.१०.१९९७ | - | १०,००० | - | - | १०,००० | - | - | - | - |
| ३ | १.१०.१९९८ | - | १०,००० | - | - | १०,००० | - | - | - | - |
| ४ | १.१०.१९९९ | २५,००० | १०,००० | - | २५,००० | १०,००० | - | - | - | - |
| ५ | १.१०.२००० | २५,००० | ७,५०० | - | २५,००० | ७,५०० | - | - | - | - |
| ६ | १.१०.२००१ | २५,००० | ५,००० | - | २५,००० | ५,००० | - | - | - | - |
| ७ | १.१०.२००२ | २५,००० | २,५०० | - | २५,००० | २,५०० | - | - | - | - |

**ब लाभार्थीस व्याजामध्ये सवलत दिली तर देय हप्ते (द.सा.द.शे. ७ टक्के प्रमाणे )**

| अ. क्र. | देय दिनांक | देय रक्कम | | | परतफेड | | | शिल्लक रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुद्दल | व्याज | दंडव्याज | मुद्दल | व्याज | दंडव्याज | मुद्दल | व्याज | दंडव्याज |
| १ | १.१०.१९९६ | - | ७,००० | - | - | ७,००० | - | - | - | - |
| २ | १.१०.१९९७ | - | ७,००० | - | - | ७,००० | - | - | - | - |
| ३ | १.१०.१९९८ | - | ७,००० | - | - | ७,००० | - | - | - | - |
| ४ | १.१०.१९९९ | २५,००० | ७,००० | - | २५,००० | ७,००० | - | - | - | - |
| ५ | १.१०.२००० | २५,००० | ५,२५० | - | २५,००० | ५,२५० | - | - | - | - |
| ६ | १.१०.२००१ | २५,००० | ३,५०० | - | २५,००० | ३,५०० | - | - | - | - |
| ७ | १.१०.२००२ | २५,००० | १,७५० | - | २५,००० | १,७५० | - | - | - | - |

मुद्दल रु.१,००,०००/-

व्याज रु.३८,५००/-

रु.५५,०००/- वजा रु.३८,५००/- = रु.१६,५००/- सवलत मिळेल.

-----

H-789 (1000-9-03)2 अ